अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,
आस्थापना विभाग, पुणे मनपा
जा.क्र. :- अनिमआ/साप्रवि/आस्था/२६२४
दिनांक :- २१/०७/२०२०

-: आदेश :-

विषय :- <u>कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.</u>
रुग्णालयातील बेड व्यवस्थापन.

संदर्भ :- १) साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम, २०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
४) आदेश जा.क्र. अनिमआ/साप्रवि/आस्था/२३५६, दि. ११/०७/२०२०.

पुणे शहरामध्ये कोरोना विषाणूचा प्रसार होऊ नये यासाठी कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोविड-१९ करिता शासकीय व खाजगी दवाखाने यांचेसाठी कामकाजाबाबत नियमावली तयार करण्यात आली आहे.

त्यानुसार बेडचे व्यवस्थापनाशी संबंधित कामे जसे, कोविड-१९ च्या संबंधित सर्व रुग्णालयांकडून रिक्त बेडची माहिती घेऊन डॅश बोर्ड अद्यावत (Update) ठेवणे, इ. कामकाजाकरिता संदर्भ क्र. ४ च्या आदेशान्वये डॉ. मनिषा नाईक, सहाय्यक आरोग्य अधिकारी यांची नियुक्ती करणेत आली आहे.

डॉ. मनिषा नाईक, सहाय्यक आरोग्य अधिकारी यांना त्यांच्या कामात मदतीकरिता सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे वरिष्ठ लिपिक या पदावरील सेवक यांची नियुक्ती करणेत येत आहे.

१) सोबत जोडलेल्या यादीतील वरिष्ठ लिपिक यांनी डॉ. मनिषा नाईक, सहाय्यक आरोग्य अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली कामकाज करावयाचे आहे.
२) सोबत जोडलेल्या यादीतील वरिष्ठ लिपिक यांनी ते रुजू झालेबाबत डॉ. मनिषा नाईक, सहाय्यक आरोग्य अधिकारी यांचेकडे अहवाल सादर करावा.
३) उपरोक्त सेवक नेमून दिलेल्या ठिकाणी हजर न झाल्यास व सदरच्या कालावधीत या कामास नकार देणा-या हलगर्जीपणा करणा-या व्यक्तींविरुद्ध संदर्भीय कायद्यान्वये कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

वरील सेवकांची नियुक्ती या कार्यालयीन आदेशाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत करण्यात येत आहे.

वरील सेवकांचे महिनेमहा चे वेतन त्यांचे मुळ नेमणूक खात्याने आदा करावयाचे आहे.
तरी संबंधीत खातेप्रमुख / प्रशासन अधिकारी यांनी पुढील योग्यती तजवीज करावी.

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत - मा.महापालिका आयुक्त,
मा. अतिरिक्त आयुक्त (वि) यांना माहितीस्तव.
प्रती – संबंधीत खातेप्रमुख/प्रशासन अधिकारी, पुणे महानगरपालिका.